
लोकमत

# दु:ख निवारणासाठी बुद्धिझम समजून घ्यावा

## राजेंद्र कुंभार : शिवाजी विद्यापीठात ज. रा. दाभोळे यांच्या 'प्रतित्यसमुत्पाद' पुस्तकाचे प्रकाशन

लोकमत न्यूज नेटवर्क



ज्येष्ठ तत्त्वज्ञ डॉ. ज. रा. दाभोळेलिखित 'प्रतित्यसमुत्पाद' या पुस्तकाचे प्रकाशन शिवाजी विद्यापीठात कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी डावीकडून श्रीकृष्ण महाजन, राजेंद्र कुंभार, दीपा श्रावस्ती उपस्थित होत्या.

**कोल्हापूर** : बुद्धाचे तत्त्वज्ञान (बुद्धिझम) हे अस्वस्थतेतून उदयास आलेले तत्त्वज्ञान असून, मानवी दु:ख निवारणासाठी ते मुळापासून समजून घेणे अत्यावश्यक आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत प्राचार्य डॉ. राजेंद्र कुंभार यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राच्या वतीने ज्येष्ठ तत्त्वज्ञ डॉ. ज. रा. दाभोळे लिखित 'प्रतित्यसमुत्पाद' या इंग्रजी पुस्तक प्रकाशनाच्या कार्यक्रमात ते बोलत होते. विद्यापीठाच्या पदार्थविज्ञान विभागाच्या सभागृहातील या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. श्रीकृष्ण महाजन होते. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर प्रमुख उपस्थित होते. डॉ. कुंभार म्हणाले, 'भारतीय परंपरेमधील नऊपैकी सहा दर्शने ही नास्तिक असल्याने भारतीय परंपरा, तत्त्वज्ञान हे मूलत: नास्तिक आहे. पाश्चात्त्य, वाळवंटी, जंगली संस्कृती या आध्यात्मिक आहेत; पण भारतातील सुबत्ता आणि संपन्नता यांमुळे येथे नास्तिकवाद निर्माण झाल्याचे दिसते.'

डॉ. महाजन म्हणाले, डॉ. ज. रा. दाभोळे यांनी बुद्ध तत्त्वज्ञानातील अत्यंत महत्त्वाच्या, पण तितक्याच दुर्लक्षित अशा 'प्रतित्यसमुत्पादा'चे विश्लेषण करणारे पुस्तक लिहिले आहे. या पुस्तकाच्या प्रकाशनामुळे विद्यापीठाच्या लौकिकात भर पडली आहे. यावेळी डॉ. जगन कराडे, पी. एस. कांबळे, रवींद्र श्रावस्ती, विनय कांबळे, आर. वाय. लिधडे, यु. के. सकट, ए. व्ही. मोहोळकर, आदी उपस्थित होते. डॉ. दीपा श्रावस्ती यांनी प्रास्ताविक केले. डॉ. अविनाश भाले यांनी आभार मानले.

### आयुष्यभर चांगला माणूस म्हणून राहा

यावेळी सन १९५३ मध्ये कर्मवीर भाऊराव पाटील, संत गाडगेबाबा आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे एकत्र आले असताना त्यांची आपण विद्यार्थीदशेत असताना भेट झाल्याची आठवण डॉ. दाभोळे यांनी सांगितली. बाबासाहेबांकडे स्वाक्षरी-संदेश मागितला असता, त्यांनी आयुष्यभर चांगला माणूस म्हणून राहा, असा संदेश दिल्याचे सांगितले. कर्मवीरांमुळेच बुद्धाच्या तत्त्वज्ञानाची ओळख झाल्याचेही त्यांनी कृतज्ञतापूर्वक नमूद केले.

# शिवाजी विद्यापीठात आहार दिवस साजरा

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठामधील तंत्रज्ञान अधिविभागातील अन्न तंत्रज्ञान विभाग व सी. सायबर ट्रस्टमधील अन्नतंत्रज्ञान आणि व्यवस्थापन विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक आहार दिवस साजरा करण्यात आला.

यावेळी सेवानिवृत्त सहायक संचालक बसवराज आवटे आणि कॉलेज ऑफ नॉन कन्वेंशनल वोकेशनल कोर्सेस फॉर वुमेनचे विभागप्रमुख डॉ. ए. आर. कुलकर्णी उपस्थित होते. आवटे यांनी अन्न उद्योगासाठी एमसीईडीच्या माध्यमातून मिळणाऱ्या विविध शासकीय योजनांबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच स्टार्टअप इंडियामधील सीड मनी मिळवून पामा फुड्स नावाची कंपनी सुरू करणारे तरुण उद्योजक प्रशांत पाटील व साहिल मणियार यांनी विद्यार्थांना नवीन उद्योगनिर्मितीसाठी प्रोत्साहित केले.

अन्न तंत्रज्ञान विभागाचे समन्वयक डॉ. ए. के. साहू यांनी जागतिक अन्न दिवसाचे महत्त्व विशद केले. प्रा. डॉ. जयदीप बागी समतोल आहाराबाबत माहिती दिली. यावेळी पोस्टर स्पर्धा, प्रश्नमंजुषा स्पर्धा, वेस्ट टू बेस्ट स्पर्धा आणि कोडी स्पर्धा घेण्यात अली होती. यामध्ये एकूण २३० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

# सुशीलादेवी साळुंखे कर्तव्यनिष्ठ त्यागमूर्ती

## डॉ. भारती पाटील यांचे प्रतिपादन

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या उभारणीत जेवढे शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांचे योगदान आहे, तितकेच संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे यांचेही आहे. त्यामुळेच संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे या कर्तव्यनिष्ठ त्यागमूर्ती होत्या, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या सामाजिक शास्त्राच्या अधिष्ठाता डॉ. भारती पाटील यांनी केले. विवेकानंद कॉलेज आयोजित संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे पुण्यतिथीनिमित्त 'आई : सुसंस्कारांची खाण' या विषयावर त्या बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे होते.

डॉ. पाटील म्हणाल्या, डॉ. बापूजी साळुंखे सतत घराबाहेर राहून संस्थेच्या शाखा विस्ताराचा, इमारत बांधणीचा, शिक्षण प्रसाराचा विचार करत होते. त्याचवेळी संस्थामाता संपूर्ण कुटुंबाची जबाबदारी स्वीकारून बापूजींच्या कार्याला हातभार लावत होत्या. प्रतिकूल परिस्थितीत संस्थामातांनी स्वतःच्या मुलांइतकेच संस्थेतील इतर मुलांवरही प्रेम व संस्कार केले.




**कोल्हापूर : श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे पुण्यतिथीनिमित्त 'आई : सुसंस्कारांची खाण' या विषयावर त्या बोलताना डॉ. भारती पाटील. सोबत डॉ. एस. वाय. होनगेकर, प्राचार्य अभयकुमार साळुंखे.**

आपल्या अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य अभयकुमार साळुंखे म्हणाले, आईच्या आठवणींवर आम्ही सारे कुटुंबीय एकत्र आलो. सर्वांनी संस्थेच्या कार्याला वाहून घेतले. डॉ. बापूजी साळुंखे यांनी उभी केलेली ज्ञानसंस्था व संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे यांनी घडवलेले संस्कार यांमुळे संस्थेचे काम करताना उत्साह व बळ येते. आमच्या आईने शिल्पकाराच्या भूमिकेतून आम्हाला घडवले. तिचे हे ऋण व संस्कार आमच्यासाठी अमूर्त अशी ठेव आहे.

कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमापूजन व संस्था प्रार्थनेने करण्यात आली. प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर यांनी केला. आभार प्रा. एस. एम. रुईकर मानले, तर सूत्रसंचालन प्रा. समीक्षा फराकटे यांनी केले. याप्रसंगी संस्थेचे माजी आजीव सेवक बाबासाहेब मोहिते, शामराव देसाई तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

# शिवाजी विद्यापीठात आहार दिवस उत्साहात

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**
शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागातील अन्न तंत्रज्ञान विभाग व सी. सायबर ट्रस्टमधील अन्न तंत्रज्ञान आणि व्यवस्थापन विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक आहार दिवस साजरा करण्यात आला. प्रमुख पाहुणे म्हणून सेवानिवृत्त सहायक संचालक व एम.सी. ई.डी. कोल्हापूरचे प्रादेशिक अधिकारी बसवराज आवटे आणि कॉलेज ऑफ नॉन कन्व्हेंशनल व्होकेशनल कोर्सेज फॉर वुमेनचे विभागप्रमुख डॉ. ए. आर. कुलकर्णी उपस्थित होते.

यावेळी बसवराज आवटे यांनी अन्न उद्योगासाठी एम.सी.ई.डी.च्या माध्यमातून मिळणाऱ्या विविध शासकीय योजनांबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच स्टार्टअप इंडियामधील सीड मनी मिळवून कंपनी सुरू करणारे तरुण उद्योजक प्रशांत पाटील व साहिल मणियार यांनी विद्यार्थ्यांना नवीन उद्योग निर्मिती करण्यासाठी प्रोत्साहित केले.

प्रास्ताविकात अन्न तंत्रज्ञान विभागाचे समन्वयक डॉ. ए. के. साहू यांनी जागतिक अन्न दिवसाचे महत्त्व सांगितले. तंत्रज्ञान विभागाचे संचालक डॉ. जयदीप बागी यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

यावेळी आयोजित विविध स्पर्धांत २३० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या कार्यक्रमासाठी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांचे मार्गदर्शन व प्रोत्साहन लाभले.